# राशिभविष्य - ऑक्टोबर, २०१८.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==============================================================

**(१) मेष -** सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव अति अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असावा, असे वाटते. तसे खरोखरच असेल तर कोणाचा धाक, जबरदस्ती, कोणी प्रेमाने समजूतदारपणे काही सुचवले तर लगेच अपमान झाल्यासारखे वाटून असह्य संताप येत असावा, असे वाटते. या राशीची लहान मुले तर अतिशय खोडकर, व्रात्य, चंचल अशी झाली असल्यास पालकांनी त्यांच्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला राहू अनिष्ट असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात सतत त्रास, कटकटी, भांडणे होणे संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण महिना अनुकुल होणार असला तरी तुलनात्मक दृष्ट्या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. हितशत्रू पराभूत होतील. नियोजित कार्य यशस्वीपणे पार पडेल. कीर्ती, प्रसिद्धी मिळेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक अनारोग्याचा त्रास होणे संभवते. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील, तर काहींना मानसिक दु:ख सहन करावे लागेल. या राशीच्या युवकवर्गाला हातची नोकरी वा कार्यक्षेत्र सोडून नवीन काही करण्याची उर्मी येईल. पण त्यांनी तसे काही करू नये. आहे तीच नोकरी वा उद्योग सहनशील बनून मनापासून करावा. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेलसे दिसते. तसेच काहींना वरिष्ठ अधिकाऱ्याचा रोष सहन करावा लागेल. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक परिस्थिती निर्माण होणे संभवते. पण औषध विक्रेते, यांत्रिक-तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ काही प्रमाणात अनुकुल होईल. महिन्याच्या पूर्वार्धातील पहिल्या दहा दिवसात ज्या स्त्रियांचा प्रसूतिकाळ आहे अशांना पुत्रलाभ होणे संभवते. तसेच विवाहेच्छूचे विवाह ठरतील. प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. महिन्याच्या उत्तरार्धात ज्यांच्या जन्मकुंडलीत योग आहे अशापैकी काहींना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. भाग्यस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे प्रवासाचे योग येतील. नेपच्यून ग्रह प्रतिकुल असून तो आर्थिक समस्या निर्माण करील. काहींना कुमार्गी मित्रांपासून त्रास होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना करा. दररोज नियमितपणे ' श्रीगणेश अथर्वशीर्ष" स्तोत्राचे पठण करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व सुखकारक होईल. हितशत्रू पराभूत होतील. पण अनारोग्याचा त्रास होणे संभवते.

महिन्याच्या पूर्वार्धात शारीरिक अनारोग्य, नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याचा त्रास, प्रिय जनांपासून होणारे दूरत्व अशा प्रकारचा मानसिक त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात राहू अनुकुल होणार असल्याने मन उत्साहित राहील व हातून कर्तृत्व घडणे संभवते. पण या राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. काही मंडळींना अंगी गुण व कर्तृत्व असूनही योग्य संधीच मिळत नसल्याने अस्वस्थ वाटेल. काही मंडळीना नसते आळ आल्याने होणारा मनस्ताप सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात बुध-गुरु या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर काहींचे प्रेमसंबंध दृढ होतील, काही मंडळीचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. पण बुध ग्रह प्रतिकुल होणार असल्याने मनस्ताप देणाऱ्या घटना घडणेही संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला शनि ग्रह प्रतिकुल असल्याने अनारोग्य, अपेक्षाभंग, अशांत मनस्थिती, असमाधानकारक घटना घडणे, अशापैकी कारणांनी दु:ख व मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या मंगळ-केतु या ग्रहांमुळे प्रवासात त्रास व मानहानी होणे संभवते. म्हणून शक्यतो प्रवास करू नका. तसेच संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या काही मंडळींकडून " वरून कीर्तन, आतून तमाशा " अशा प्रकारचे ढोंगी आचरण होणे संभवते. पण त्यामुळे सुखसमाधान लाभणार नाही. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे मानसोपचार तज्ञांना व द्रव पदार्थ व्यापार असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण इतर नोकरी-व्यवसाय असणारांच्या कार्यक्षेत्रात अस्थिर परिस्थितीच असल्याचा अनुभव येईल. तसेच या राशीच्या व्ययस्थानी असलेला हर्षल ग्रह प्रतिकुल असून त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील, काहींना वाईट प्रसंगाला तोंड द्यावे लागेल, काहींना जिवावरच्या प्रसंगाशी मुकाबला करावा लागेल, तर काही मंडळींच्या जीवनात बेअब्रूचे प्रसंग निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना करा . त्यामुळे मन खंबीर होईल व मन:शक्ती वाढून प्रतिकुल ते सहन करण्याची कुवत निर्माण होईल. दररोज नियमितपणे एक माळ "ओम नम: शिवाय" मंत्राचा जप करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ बऱ्याच प्रमाणात प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याचा त्रास सहन करावा लागेल. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे, दिरंगाई असे काही होणे संभवते. त्यात कौटुंबिक त्रास व समस्यांची भर पडली तर त्याचा परिणाम शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्यात होणे संभवते. बुध ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मित्रसुख व गृहसौख्य मिळू शकेल; पण धननाश होणेही संभवते. तसेच संततिविषयक समस्या त्रस्त करील व जीवनसाथीकडूनही मनस्ताप दिला जाणे

संभवते. गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने या राशीचे विद्यार्थी अपेक्षित शैक्षणिक प्रगती करू शकतील, आर्थिक लाभ होतील व प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. सर्व प्रकारच्या कलाकारांना कलेसाठी कला या नियमाप्रमाणे कलानिर्मितीचा आनंद व सुख समाधान मिळेल; पण आर्थिक लाभ होणे संभवत नाही. महिन्याच्या उत्तरार्धात बुध-गुरु या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर अधिक अनुकुल होतील व त्यामुळे आरोग्य उत्तम राहील, हाती घेतलेले कार्य पूर्णत्वास जाईल. धनलाभही होईल आणि सर्व प्रकारचे आरोग्यही सुधारेल. हे बुध-गुरु बौद्धिक व शैक्षणिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होतील व त्यामुळे त्या कार्यक्षेत्रात प्रगती करणे , अर्थलाभ होणे शक्य होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे जीवनसाथीचे अनारोग्य हळुहळू बिघडण्याची शक्यता आहे. काहींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. पण हा शनि कायदाविषयक अभ्यासास अनुकुल होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळ-केतुमुळे उष्णताविकारांनी अनारोग्य होणे संभवते. काही मंडळीना मूळव्याधीचा आजार त्रस्त करील. छोट्या अपघाताने हाडमोड होणे संभवते. पाणी, वीज यांपासून धोका असल्याने जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहू नका. तसेच विजेची उपकरणे काळजीपूर्वक हाताळा. केतूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच काही मंडळीना रक्तविकाराचा तर काहीना त्वचाविकाराचा आजार त्रस्त करील. कुटुंबात वाद, भांडणे झाल्यास कौटुंबिक सुखात बाधा येईल. तसेच गृहसौख्यही मिळणार नाही. जपा. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षलमुळे अर्थलाभ होणे संभवते. पण मित्रांशी भांडणे होणेही संभवते, अध्यात्माची आवड असेल तर उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काहींना सूचक स्वप्ने पडतील. काहींना परदेशगमनाचा योग येईल. लाभस्थानी असलेल्या हर्षलमुळे अर्थलाभ होणे संभवते; पण मित्रांशी भांडणे होणे मात्र नक्की . श्रद्धा असेल तर कुलस्वामिनीची उपासना करा. दररोज नियमितपणे श्रीमहालक्ष्मी स्तोत्राचे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या राहूमुळे सतत अपमान सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळे असह्य संताप येणे संभवते. संतापाच्या भरात सूड भावना प्रज्वलित होईल. पण रागावर नियंत्रण ठेवून मनावर व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून आचरण करा. नपेक्षा शारीरिक अनारोग्य होणे शक्य दिसते. विशेष करून वातविकाराचा आजार होणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होणार असल्याने त्यांनी जे काय साधायचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात सतत नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होणे संभवते.

त्यात कौटुंबिक समस्यांचा त्रास, अनपेक्षित खर्च निर्माण होणेही संभवते, बुधामुळे महिन्याच्या पूर्वार्धात हितशत्रूंचा त्रास सहन करावा लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात हाच बुध मित्रसुख व गृहसौख्य देईल. गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुख मिळेल; पण नातलगांपैकी कोणाकडून तरी त्रास दिला जाणे शक्य दिसते. स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होतील. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रह या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर या राशीच्या विद्यार्थ्यांना अनुकुल होईल व त्यांना शैक्षणिक प्रगती सहज करता येईल. प्रेमसंबंध वाढतील, आणि सर्व सुखाचेच होईल. पण या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या मंगळ-केतूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी संशयाने किंवा अन्य कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. जलभय असल्याने जलप्रवास करू नका, तसेच विष भय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे या राशीच्या बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना प्रगती करणे, यश मिळविणे शक्य होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व मन:शांती मिळेल.

**(५) सिंह -** महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे अशापैकी कारणानी अस्वस्थ व्हाल. तसेच या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच सर्व प्रकारे अनुकुल, प्रगतिकारक व सुखकारक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात मनस्ताप व शारीरिक अनारोग्य त्रस्त करीलसे दिसते. विशेष करून डोळ्याचे अनारोग्य त्रस्त करील. तसेच भावंडापैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. हितशत्रूकडून त्रास होणेही संभवते. अशा परिस्थितीतही शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे काही मंडळीना भूमिलाभ, कोणास तरी मानाचे स्थान मिळणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. प्रवासाचे योग संभवतात. गुरु-बुध या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळू शकेल. काही मंडळींचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पूर्ण होतील. मित्रसुख मिळेल. शनि ग्रह चिकाटीने अभ्यास करू शकणाऱ्या या राशीच्या विद्यार्थ्यांना व अन्य बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्रात चिकाटीने कार्यरत राहू शकणारांनाच प्रगतिकारक होईल. आरोग्यस्थानी असलेले मंगळ-केतू ग्रहांपैकी मंगळ आरोग्यविघातक होणार असून या राशीच्या काही मंडळींना उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. दुखापत होणेही संभवते. काही मंडळीना रक्तविकाराचा तर काहींना हृदयविकाराचा त्रास होणे संभवते. पण केतू अनुकुल असल्याने आरोग्य गंभीर असे बिघडणार नाही. सप्तम स्थानी असणारा नेपच्यून ग्रह मानसिक अनारोग्य देऊन वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण

करीलसे दिसते. भाग्यस्थानी असलेल्या हर्षलमुळे शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना सहज अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. तसेच काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशवारीचे योग देईल. व्ययस्थानी असलेला राहू हितशत्रूपासून रक्षण करील. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे " ओम गं गणपतये नम:" मंत्राचा एक माळ जप करा.

**(६) कन्या -** या संपूर्ण महिन्याच्या काळात रवि-बुध हे दोन्ही ग्रह शारीरिक-मानसिक आरोग्यविघातक असले तरी महिन्याच्या पूर्वार्धात गुरु ग्रहामुळे आरोग्य फारसे बिघडणार नाही. पण बुधामुळे काहींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. तसेच मित्रद्रोह होणे संभवते, जपा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. स्वतंत्र व्यवसाय असणारांना प्रगती करणे शक्य होईल. आर्थिक लाभ होतील. महिन्याच्या उत्तरार्धात काहींना प्रवासाचे योग येतील. साहित्यिकांचे साहित्य ग्रंथरूपाने प्रकाशित होईल. मात्र हितशत्रूचा त्रास होणे संभवते. शनि ग्रहामुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. त्यामुळे नैराश्य येईल. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेले मंगळ-केतू संततिसुखात बाधा निर्माण करतील. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाची आचरणविषयक समस्या त्रस्त करील. काही मंडळीना स्थावरविषयक समस्या त्रस्त करील. या राशीचा गर्भवती महिलांनी अकारण दगदग करू नये. पण वैद्यकीय शिक्षण घेत असणारांना हा मंगळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. केतुमुळे या राशीच्या अन्य प्रकारचे शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होतील. जपा. नेपच्यूनमुळे काही मंडळीना उगीचच एखादी आजारभावना त्रस्त करील, किंवा एखादी काल्पनिक चिंता मनस्ताप देईल. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. वाहन नियंत्रित वेगाने व सावधानतेने चालवा. या राशीच्या शासकीय नोकरीत अधिकार पद असणारांनी वाममार्ग धनाचा मोह कटाक्षाने टाळावाच.
"होत्याचे नव्हते" होण्यास वेळ लागणार नाही. जपा. तसेच ज्यांना जुगाराची सवय आहे त्यांनीही तो मोह टाळावा. लाभ न होता नुकसानच होईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयांची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल आहे असेच म्हणावे लागेल. कारण शारीरिक-मानसिक अनारोग्याच्या समस्या त्रस्त करतील. नोकरीत असमाधानकारक घटना घडणे, कामात चुका होणे, वरिष्ठांकडून

होणारे अपमान सहन करावे लागणे अशा प्रकारच्या घटना घडल्यास गहरे नैराश्य येणे संभवते. पण राहूमुळे या राशीच्या काही कर्तृत्ववान मंडळींचा सन्मान होणेही संभवते. या राशीच्या ज्या मंडळीना रक्तदाब, हृदयविकार अशी दुखणी आहेत त्यांनी विशेष जपावे. शिवाय काही मंडळीना आर्थिक चिंता त्रस्त करतीलसे दिसते. काही मंडळीना कुसंगतीची बाधा त्रस्त करील. बौद्धिक, शैक्षणिक कार्यक्षेत्र असणाराना काळ अनुकुल,

प्रगतिकारक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. काही प्रमाणात शुक्र ग्रह अनुकुल व सुखकारक होईल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे या राशीच्या काही युवकांना अपेक्षित अशी उत्तम नोकरी मिळेल. काहींना नवे कार्यक्षेत्र मिळेल. पण एखाद्या भावंडाबाबत एखादी चिंता त्रस्त करील. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेले मंगळ व केतू कौटुंबिक सुखसमाधान मिळू देणार नाहीत. भांडणे, गैरसमज, एखादी असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळणे अशक्य होईल. पंचम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय भावनाशील झाली असल्यामुळे मन:शांतीसाठी त्यांनी आध्यात्मिक उपासना करावी. अशा उपासनेस काळ अनुकुल आहे. त्यामुळे आध्यात्मिक उन्नती होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभणार नाही. जीवनसाथीचे लहरी, विक्षिप्त आचरण, दोघांतील वाद, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते, भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशयाने किंवा अन्य कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे एक माळ “ओम नम: शिवाय" मंत्राचा जप करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या ज्या मंडळीना अध्यात्मात रस आहे, समाजकार्यात रस आहे, त्यांना या महिन्याचा पूर्वार्ध अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण हा काळ कौटुंबिक सुखाचे दृष्टीने त्रासदायक व अपेक्षाभंग करणारा असाच सिद्ध होईल. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना व स्वतंत्र व्यवसाय असणारांना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असणार आहे. रवि-बुध अनुकुल असल्यामुळे मुळे त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. बुध ग्रहामुळे धनलाभ व मित्रलाभ होणे संभवते. पण रवि-बुध हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल होणार असल्यामुळे नंतर मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहून शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. जपा. गुरु ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल होईल; पण बुध ग्रह मात्र

प्रतिकुलच असणार आहे. कोणतेही बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना, साहित्यिकांना महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. धनस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे आर्थिक समस्या व संकटे अस्वस्थ करतील. तसेच कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. तृतीय स्थानी असलेले मंगळ व केतू हे काही बाबतीत अनुकुल तर काही बाबतीत प्रतिकुल होतील. त्यामुळे धैर्य, हिंमत , महत्वाकांक्षा वाढली तरी कर्तृत्व सिद्ध करणे कठीणच होईल. कारण हितशत्रूचा त्रास होणे संभवते. गृह्सौख्यात बाधा येणे शक्य दिसते. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास पूरक असला तरी तो अनारोग्यकारक होणे संभवते. त्यामुळे काही मंडळींना असह्य डोकेदुखीचा तर काहींना मेंदूविकाराचा आजार होणे संभवते. जपा. राहूमुळे प्रवासाचे योग येतील. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना करा. मन:शांती मिळेल. दररोज नियमितपणे “ओम नम: शिवाय" मंत्राचा एक माळ जप करा. तसेच ‘हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. मात्र शारीरिक मानसिक आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. कारण या राशीच्या मंडळींची मन:स्थिती सध्या अतिशय भावनाशील झाली असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येण्याची शक्यता असते. शिवाय या महिन्याच्या काळात शनि-मंगळ हे दोन्ही ग्रह प्रतिकुल असून आरोग्यविघातक आहेत. त्यामुळे स्वत:चे अनारोग्य, जीवनसाथीचे अनारोग्य निर्माण झाल्यास नैराश्य येणारच. त्यात भर म्हणून अनपेक्षितपणे येणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या, त्या कशा पुऱ्या करावयाच्या याची चिंता त्रस्त करील. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकाराचे आजार त्रस्त करतील. घसा, मान, दाढा, दुखणे, डोळे तळावणे असे आजार होणे संभवते. जपा. अध्यात्म, गूढ विद्या अशा विषयांत रस असणाराना या विषयात संशोधन व प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. तसेच या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे शास्त्रीय संशोधन व उच्च बौद्धिक संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना प्रगती करणे सहज शक्य होईल. हा हर्षल कलावंताना व प्रेमिकांना पोषक असून त्यांचे प्रेम सफल होईल. कलाकारांना आपल्या कलाविश्वात प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाची तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या राहूमुळे जीवनसाथी सुखी राहील व जन्म कुंडलीत योग असेल तर काहींना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी असलेले बुध-गुरु-शुक्र या तीनही शुभ

ग्रहांमुळे अपेक्षित सुखसमाधान मिळेल. पण थोडा कौटुंबिक त्रास होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत प्रतिकुल परिस्थिती
निर्माण होण्याची शक्यता आहे. आपला स्वभाव हटवादी व मानापमान फार असणारा असा असल्यामुळे अकारण श्रम, दगदग होईल व त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणे संभवते. जपा. शिवाय वाहनधोका असल्यामुळे विचाराच्या तंद्रीत रस्त्याने चालू नका, वाहन चालवू नका. जपा. शनि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने नवी नवी संकटे येणे संभवते. विशेष करून आर्थिक संकटे अधिक येणे संभवते. म्हणून सर्व आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक व सर्व काही बरोबर असल्याची खात्री करूनच करा. नपेक्षा मानहानी होईल, अनारोग्य होईल व असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षलमुळे आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही, सतत तक्रारी करत बसाल व त्यामुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभणार नाही. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुख लाभणार नाही. तसेच वाममार्ग धनाच्या मागे लागलात तर स्वत:च आपले नुकसान करून घ्याल. जपा. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे बौद्धिक, शैक्षणिक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र शुक्रामुळे कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना नियोजित कार्यात अडथळे , मनस्ताप सहन करीतच काळ व्यतीत करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु-बुध या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर तर या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग येणे संभवते. विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रगती करणे शक्य होईल. तसेच मित्रलाभ, धनलाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे “ओम नम: शिवाय “ मंत्राचा एक माळ जप करा. तसेच “ हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत कोमल झाली असावी, असे वाटते. तसे असेल तर मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असल्या पाहिजेत. तसे असेल तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. आपली राशी बौद्धिक कार्यक्षेत्राला उपयुक्त असून हर्षलसारखा उच्च

बौद्धिक व शास्त्रीय संशोधनास अनुकुल असणारा ग्रह सध्या आपणांस “देता किती घेशील दो करांनी" इतका अनुकुल आहे. त्यामुळे चिकित्सक उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधानात्मक कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांनी क्षण क्षण पकडून त्याचा लाभ घ्यावा व आपले ध्येय गाठण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. याच हर्षलमुळे काही भाग्यवंताना परदेशवारीची संधी मिळेल. तसेच या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या राहूमुळे इतर जातिधर्मीय मंडळींशी ज्यांचा व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण याच राहूमुळे काहीना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच या राहूमुळे हितशत्रू पराभूत होतील. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना या संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे, अनारोग्य होणे, हाती घेतलेल्या कामात अपयश येणे, वरिष्ठ नाराज असणे, त्यामुळे पदावनती होणे अशापैकी कारणानी अस्वस्थ व्हाल. जपा. पण गुरुशुक्र हे दोन्ही शुभ ग्रह अनुकुल असल्यामुळे परिस्थिती फारशी बिघडणार नाही. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत काही शुभ घटना घडतील व दिलासा मिळेल. पण या राशीच्या कलाकारांना व कलात्मक व्यवसाय असणाराना मात्र अडचणी व अडथळयाना सामोरे जावे लागेल. शनि ग्रह अनुकुल असला तरी संततिसुखास प्रतिकुल होईल . त्यामुळे अपेक्षित संततिसुख मिळणार नाही. तसेच मंगळ-केतू हे ग्रहही प्रतिकुल असून शारीरिक मानसिक आरोग्य बिघडविण्यास कारणीभूत होतील. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे “ओम नम: शिवाय “ मंत्राचा एक माळ जप करा. तसेच “श्रीहनुमानचालिसा" स्तोत्राचे नित्यनेमाने पठण करा.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती व विचारशक्ती अतिशय चंचल, अस्थिर, अविचारी अशी घडली असण्याची शक्यता दिसते. तसे असेल तर हातून विचित्र आचरण घडत असले पाहिजे. तसेच अविचाराने खर्च होणे, समोरच्या माणसाचा आपल्या फटकळ बोलण्याने अपमान होत आहे ही गोष्टही लक्षात न येणे, असे घडत असेल. असे घडण्याचे कारण म्हणजे कसल्या तरी चिंतेने मानसिक व्यग्रता आली असण्याची शक्यता दिसते. त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. शिवाय शारीरिक अनारोग्यही त्रस्त करीत असावे, असे वाटते. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्ध बरा जाईल; पण महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागेल. मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील. पण बुध ग्रह काही काळ अनुकुल असल्याने थोडे बरे वाटेल. शिवाय गुरु ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत योग आहे अशापैकी काहीना महिन्याच्या पूर्वार्धात अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने

धनलाभ होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील, प्रवासयोग येईल, अध्यात्म कार्यक्षेत्र असेल तर उपासनेद्वारा आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. कोळसा, लोखंड यांचा व्यापार-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. लाभस्थानी असलेल्या मंगळ-केतूमुळे काळ अनुकुल होईल; पण कष्ट-परिश्रमानेच अर्थप्राप्ती होईल. शिवाय मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. पण काही भाग्यवंताना मौल्यवान गोष्टींचा लाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====